ePaper

## पोलिसांच्या धक्काबुक्कीनंतर प्रियंका गांधी थेट रस्त्यावरच झोपल्या



वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™

WWW.MAHAENEWS.COM | गुरुवार, दि. 08 ऑक्टोबर 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



पान 3 वरुन...

मोशीतील 'आय.आय.एम.' प्रकल्पाला गती; जागेची पाहणी

## दुष्काळाच्या संकटावर अमित शहांची भेट; केंद्राकडून भरीव मदतीची मागणी



# महाराष्ट्राच्या मदतीसाठी फडणवीस दिल्लीदरबारी

**महाईन्यूज । नवी दिल्ली / मुंबई**

**महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज दिल्ली दौऱ्यावर आहेत. त्यांनी दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. या भेटीत नेमकी काय-काय चर्चा झाली? या विषयी देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांना प्रतिक्रिया देताना सविस्तर सांगितलं. "मी अमित शाह यांची आज भेट घेतली. आपल्याला कल्पना आहे की, देशाचे गृहमंत्री हे एनडीआरएफचे प्रमुख असतात आणि इंटर मिनिस्ट्रल ग्रुपचे देखील अध्यक्ष असतात. दुष्काळाच्या संदर्भात किंवा कुठल्याही एनडीआरएफच्या मदती संदर्भात आपले जे काही प्रस्ताव असतात ते या ग्रुपकडे जातात. या ग्रुपच्या बैठकीचे अध्यक्ष गृहमंत्री अमित शाह असतात", अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली.**

"आपण जो काही प्रस्ताव पाठवला आहे त्याची माहिती देण्यासाठी गृहमंत्री अमित शाह यांच्याकडे गेलो होतो. त्या प्रस्तावाची प्रतदेखील अमित शाह यांना दिली आहे. मी त्यांना सांगितलं की, महाराष्ट्रात प्रचंड दुष्काळ आहे. पिण्याच्या पाण्याची समस्या देखील तयार होणार आहे. चाऱ्याची समस्यादेखील तयार होणार आहे. जवळपास 32 जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात दुष्काळ बघायला मिळत आहे आणि आपण विचार केला तर 80 टक्के तालुके हे दुष्काळाने पूर्णपणे प्रभावित पाहायला मिळतात. केंद्र सरकारने महाराष्ट्राला विशेष मदत करावी. आम्ही जो प्रस्ताव पाठवतोय त्या संदर्भात तात्काळ केंद्राची टीम यावी, अशा-प्रकारची विनंती त्यांना केलेली आहे", अशी माहिती देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

"बैठक अतिशय सकारात्मक झाली. एअरफोर्सने सांगितलं की, टर्मिनल तयार करण्याकरता जी जागा आहे ती तात्काळ हस्तांतरीत करतील. त्या जागेच्या दुसऱ्या भागावर त्यांना कंस्ट्रक्शन करायचे आहे, तिथे कंस्ट्रक्शन करुन तो दुसरा भागही आपल्याला हस्तांतरीत करतील. त्या संदर्भात अतिशय सकारात्मक अशी चर्चा झाली. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी ऑनलाइन माध्यमातून बैठकीत उपस्थित होते", अशी प्रतिक्रिया देवेंद्र फडणवीसयांनी दिली.

### फडणवीस यांनी केंद्रीय संरक्षणमंत्र्यांची घेतली भेट

"माझी दुसरी बैठक केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्यासोबत झाली आहे. या बैठकीचा उद्देश विशेषत: जे नागपूर विमानतळ तयार करत आहोत, त्यामध्ये आपल्याला नवीन टर्मिनल बिल्डींग करायची आहे. त्याठिकाणी 27 एकर जागा ही एअरफोर्सकडे आहे. त्या ठिकाणाहून त्यांचं काम चालतं. ती जागा तात्काळ आपल्याला मिळावी, जेणेकरुन हे काम आपल्याला वेगात पूर्ण करता येईल. या दृष्टीने त्यांच्यासोबत बैठक झाली", असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

### केंद्राची टीम पाहणीसाठी येणार

"केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्यासोबत चर्चा झाली होती. ही टीम 8 तारखेपासून महाराष्ट्रात येईल, असं आम्हाला सांगण्यात आलं आहे. 8 तारखेपासून 11 तारखेपर्यंत ही टीम महाराष्ट्रातील विविध भागांची पाहणी करुन दुष्काळाची परिस्थिती काय आहे, याची तपासणी करेल. त्यानंतर ही टीम आपला रिपोर्ट एनडीआरएफला सादर करेल. त्यांचा रिपोर्ट आणि पाठवलेला प्रस्ताव या आधारावर एनडीआरएफ त्या संदर्भात निर्णय घेईल. त्या दृष्टीने अत्यंत वेगाने हे सर्व निर्णय होत आहेत", असं देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं.





# पुण्यात 'रीडेव्हलपमेंट'चे वारे!

## एकूण प्रकल्पांमध्ये एक तृतीयांश प्रमाण; कोथरूड पहिल्या क्रमांकावर

महाईन्यूज । पुणे

**पुण्यातील वाढत्या पुनर्विकासाच्या प्रक्रियेत कोथरूडने आघाडी घेतली आहे. पुणे जिल्ह्यात गेल्या दशकभरात महारेरा नोंदणीकृत पुनर्विकासाच्या ६२९ प्रकल्पांपैकी २४४ प्रकल्प एकट्या कोथरूडमधील आहेत. कोथरूडमधील एकूण गृहनिर्माण प्रकल्पांमध्ये पुनर्विकास प्रकल्पांचा वाटा ६० टक्के असल्याचे 'द रीडेव्हलपमेंट पल्स' या अहवालातून समोर आले आहे.**



ड्रीम्स रीडेव्हलप्ड या पुनर्विकास सल्लागार व विदा मंचाने हा अहवाल जाहीर केला आहे. 'महारेरा'च्या आकडेवारीच्या आधारे पुण्यातील पुनर्विकासाच्या स्थितीचे विश्लेषण या अहवालात करण्यात आले आहे. या अहवालानुसार, पुणे जिल्ह्यात २०१७ ते २०२६ या कालावधीत 'महारेरा'कडे नोंदणीकृत असलेले ४ हजार ८२३ प्रकल्प आहेत. त्यापैकी ६२९ प्रकल्प पुनर्विकासाचे आहेत. एकूण प्रकल्पांमध्ये पुनर्विकास प्रकल्पांचे प्रमाण २०१७ मध्ये केवळ ४ टक्के होते. हे प्रमाण २०१८ मध्ये ६ टक्के, २०१९ मध्ये ५ टक्के, २०२० मध्ये १० टक्के, २०२१ मध्ये १० टक्के, २०२२ मध्ये १४ टक्के, २०२३ मध्ये २३ टक्के, २०२४ मध्ये २६ टक्के, २०२५ मध्ये २५ टक्के आणि २०२६ मध्ये २६ टक्के आहे.

गेल्या दशकभरात पुणे जिल्ह्यातील पुनर्विकास प्रकल्पांची संख्या ६२९ आहे. त्यापैकी २४४ म्हणजेच एक तृतीयांश प्रकल्प कोथरूडमधील आहेत. कोथरूडमधील गेल्या १० वर्षांतील एकूण गृहनिर्माण प्रकल्पांची संख्या ४१० असून, त्यापैकी ६० टक्के पुनर्विकास प्रकल्प आहेत. कोथरूडमधील पुनर्विकास प्रकल्पांपैकी ६२ प्रकल्प काम पूर्ण झालेले असून, १५० प्रकल्पांचे काम सध्या सुरू आहे. याचवेळी ३२ प्रकल्प मुदतीत पूर्ण न झाल्याने व्यपगत ठरले आहेत. कोथरूडमध्ये सर्वाधिक २२ पुनर्विकास प्रकल्प डहाणूकर कॉलनीत असून, रामबाग कॉलनीत १७ आणि आयडियल कॉलनीत ९ प्रकल्प आहेत. कोथरूडनंतर एरंडवणे-डेक्कन, पर्वती-सहकारनगर, पिंपरी-चिंचवड, गुलटेकडी-बिबवेवाडी आणि शिवाजीनगर-भांबुर्डा हे पुनर्विकासाचे प्रमुख भाग बनले आहेत, असे अहवालात म्हटले आहे.

### सरासरी १६ महिने मुदतवाढ

'महारेरा'कडून मूळ मुदत ओलांडलेल्या पुनर्विकास प्रकल्पांना सरासरी १६ महिन्यांची मुदतवाढ मिळाली आहे. येत्या काळात पूर्णत्वाच्या मुदतीचा दबाव वाढण्याची शक्यता आहे. जिल्ह्यात २०२६ व २०२७ मध्ये २१४ पुनर्विकास प्रकल्प पूर्ण होणे अपेक्षित आहे. त्यापैकी ९१ प्रकल्पांची पूर्णत्वाची नियोजित मुदत २०२६ मध्ये आणि १२३ प्रकल्पांची २०२७ मध्ये आहे. याशिवाय, सध्या मुदत ओलांडलेले ३० प्रकल्प सुरू असून, ५३ प्रकल्पांना किमान एकदा मुदतवाढ मिळाली आहे, असे अहवालात नमूद करण्यात आले आहे.

## 'ग्रँड टूर' सायकल स्पर्धा अन् महापालिका काढणार २५० पेक्षा जास्त गतिरोधक!

महाईन्यूज । पुणे

**पुणे शहरात जानेवारी २०२७ मध्ये होणाऱ्या आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धेच्या १३६ किलोमीटरच्या संपूर्ण मार्गावर विविध यंत्रणांकडून सुरू असलेली खोदाईची कामे येत्या ३१ ऑक्टोबरपर्यंत पूर्ण करण्याचे आदेश शहर अभियंता अनिरुद्ध पावसकर यांनी दिले आहेत.**




सायकल स्पर्धा नियोजनाची तयारी महापालिकेने सुरू केली आहे. ज्या मार्गावर स्पर्धा होणार आहे, अशा सुमारे १३६ किलोमीटरच्या मार्गावर पाणीपुरवठा, मलनिस्सारण, महावितरण, गॅस कंपनी, आय-ट्रिपल-सी, पोलिसांचे सीसीटीव्ही यांसह विविध यंत्रणांकडून सुरू असलेली खोदाईची कामे येत्या ३१ ऑक्टोबरपर्यंत पूर्ण करण्याचे आदेश पावसकर यांनी दिले आहेत.

'पुणे ग्रँड टूर सायकल' स्पर्धेच्या आयोजनासाठी महापालिकेत शहर अभियंता पावसकर यांनी बैठक घेतली. या बैठकीला अतिरिक्त पोलीस आयुक्त (वाहतूक विभाग) मनोज पाटील, महापालिकेचे पथ विभागाचे प्रभारी मुख्य अभियंता राजेश बनकर तसेच महापालिकेच्या विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. ३१ ऑक्टोबरनंतर स्पर्धेच्या मार्गावर कोणालाही खोदकामाची परवानगी दिली जाणार नसल्याचे पावसकर यांनी सांगितले.

स्पर्धेच्या मार्गिकेवरील रस्ते आंतरराष्ट्रीय मानकांनुसार तयार करण्याबाबत संबंधितांना सूचना देण्यात आल्या. सायकल स्पर्धेच्या मार्गिकेवर विविध सेवा वाहिन्यांसाठी सुरू असलेल्या खोदकामांचा आढावा घेण्यात आला. यामध्ये एमएनजीएल, एमएसडीसीएल, दिनेश इंजिनिअरिंग, सीसीटीव्ही ॲलाइड कंपनी, महापालिकेच्या पाणीपुरवठा, ड्रेनेज आणि विद्युत विभागाच्या कामांचा समावेश आहे. ही सर्व कामे ऑक्टोबरअखेरपर्यंत पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्याचे पावसकर यांनी सांगितले.

आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धेत सहभागी होणाऱ्या सायकलपटूंना सलग आणि गुळगुळीत पृष्ठभाग मिळावा यासाठी स्पर्धेच्या मार्गावरील सर्व गतिरोधक आणि उंचावलेले पादचारी मार्ग तात्पुरते हटविण्यात येणार आहेत. स्पर्धा होणार असलेल्या मार्गावर सुमारे २२५ ते २५० पेक्षा अधिक गतिरोधक आहेत. हे सर्व गतिरोधक काढून टाकले जाणार आहेत. ही स्पर्धा पूर्ण झाल्यानंतर अपघाताचा धोका टाळण्यासाठी काढलेले गतिरोधक तातडीने पुन्हा बसविण्यात येणार असल्याचे शहर अभियंता अनिरुद्ध पावसकर यांनी सांगितले.

### काही रस्ते नव्याने, काही दुरुस्त

ग्रँड टूरसाठी चार 'पंकेज'मध्ये सुमारे १३६ किलोमीटरच्या रस्त्यांची कामे करण्यात येणार आहेत. यातील काही रस्ते नव्याने तयार केले जाणार आहेत. गेल्या वर्षीच्या स्पर्धा मार्गावरील ५२ किलोमीटरचे रस्ते दुरुस्त करण्यात येणार आहेत. यासाठी चार पॅकेज तयार करण्यात आली आहेत. त्याची कामे सुरू झाली आहे. यामध्ये रस्त्यांचे पुनर्डांबरीकरण, चेंबरची पातळी रस्त्याशी समांतर करणे, पदपथांची दुरुस्ती, आवश्यक ठिकाणी नवीन पदपथ, तुटलेल्या दुभाजकांची दुरुस्ती आणि रंगकामाचा समावेश आहे. भिंतींचे रंगकाम, सुशोभीकरण अशी कामेदेखील केली जाणार आहेत.

# मोशीतील ‘आय.आय.एम.’ प्रकल्पाला गती; जागेची पाहणी

## आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकारातून प्रकल्पाच्या पुढील प्रशासकीय कार्यवाहीला वेग

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवडच्या शैक्षणिक विकासाला नवी दिशा देणाऱ्या भारतीय व्यवस्थापन संस्था (आय.आय.एम.)च्या मोशी येथील प्रस्तावित कॅम्पसच्या उभारणीच्या दिशेने आणखी एक महत्त्वाचे पाऊल पडले आहे. आय.आय.एम. पुणे संस्थेच्या उभारणीसाठी प्रस्तावित जागेची बुधवारी (दि. ७) प्रत्यक्ष स्थळ पाहणी करण्यात आली. या पाहणीदरम्यान संस्थेच्या उभारणीसाठी आवश्यक जमीन, पायाभूत सुविधा, प्रशासकीय बाबी आणि भविष्यातील विकास आराखड्याबाबत सविस्तर चर्चा झाली.**



> “पिंपरी-चिंचवडमध्ये जागतिक दर्जाच्या शैक्षणिक संस्था उभ्या राहाव्यात, हा माझा सातत्याने प्रयत्न आहे. आय.आय.एम.सारखी प्रतिष्ठित संस्था आपल्या शहरात उभी राहणे ही केवळ शैक्षणिक क्षेत्रासाठी नव्हे, तर संपूर्ण परिसराच्या भविष्यासाठी महत्त्वाची बाब आहे. या संस्थेमुळे उच्च दर्जाचे व्यवस्थापन शिक्षण, संशोधन, कौशल्यविकास आणि उद्योग क्षेत्राशी समन्वयाला मोठी चालना मिळेल. आज झालेली प्रस्तावित जागेची स्थळ पाहणी हा या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या पुढील वाटचालीतील महत्त्वाचा टप्पा आहे. आवश्यक प्रशासकीय व तांत्रिक बाबींची पूर्तता करून हा प्रकल्प प्रत्यक्षात आणण्यासाठी शासन, प्रशासन आणि संबंधित संस्थांच्या समन्वयातून पाठपुरावा सुरू राहील. पिंपरी-चिंचवडला शिक्षण, संशोधन आणि नवउद्योजकतेचे महत्त्वाचे केंद्र बनविण्याच्या दिशेने हे एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरेल.”
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकारातून मोशी येथे आय.आय.एम.चे कॅम्पस उभारण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. महाराष्ट्र शासनाने मोशी येथील शासकीय जमीन आय.आय.एम. नागपूरच्या शैक्षणिक व प्रशिक्षण कॅम्पससाठी उपलब्ध करून देण्यास मंजुरी दिली आहे. जुलै २०२६ मध्ये केंद्र सरकारच्या प्रसिद्धीपत्रकानुसार, मोशी येथे ७० एकर क्षेत्रावर पूर्ण क्षमतेचे शैक्षणिक व निवासी कॅम्पस विकसित करण्याची योजना असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

या पार्श्वभूमीवर आय.आय.एम. नागपूरच्या संचालक मंडळाचे अध्यक्ष सी. पी. गुरनानी, सदस्य प्रा. भीमराया मेट्री, अरुण अनंत व प्रा. प्रशांत गुप्ता, तसेच बांधकाम समितीचे अध्यक्ष वैभव डांगे आणि सदस्य आशु तोमर, प्रा. सोम शेखर भट्टाचार्य व प्रा. राठ यांनी प्रस्तावित जागेची पाहणी केली.

महसूल विभागाचे मंडल अधिकारी श्री. सैद व संबंधित तलाठी, तसेच पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या नगररचना विभागाचे अधिकारी जगदाळे व बोऱ्हाडे यांनी जागेची सद्यस्थिती, उपलब्ध क्षेत्र, प्रशासकीय प्रक्रिया आणि आवश्यक पायाभूत सुविधांची माहिती दिली. यावेळी आमदार महेश लांडगे यांचे स्वीय सहाय्यक अनिकेत गायकवाड उपस्थित होते.

स्थळ पाहणीदरम्यान प्रस्तावित कॅम्पसच्या उभारणीसाठी आवश्यक विविध बाबींचा प्रत्यक्ष आढावा घेण्यात आला. तसेच भविष्यातील शैक्षणिक, संशोधनात्मक व विकासात्मक प्रकल्प, विद्यार्थी व प्रशिक्षणार्थींसाठी आवश्यक सुविधा, पायाभूत सुविधा आणि संस्थेच्या उभारणीसाठीची पुढील प्रशासकीय कार्यवाही याबाबत उपस्थित मान्यवर आणि अधिकाऱ्यांमध्ये सविस्तर चर्चा झाली.

आय.आय.एम.च्या पुणे कॅम्पससाठी मोशीची निवड झाल्यास पिंपरी-चिंचवडच्या शैक्षणिक परिसंस्थेला मोठी चालना मिळण्याची अपेक्षा आहे. व्यवस्थापन शिक्षण, कौशल्यविकास, संशोधन आणि उद्योग-शिक्षण क्षेत्रातील सहकार्याला यामुळे नवे व्यासपीठ उपलब्ध होऊ शकते. आय.आय.एम. नागपूरने यापूर्वीही पुणे कॅम्पससाठी औद्योगिक पट्ट्याशी जोडलेले आणि शहराशी चांगली कनेक्टिव्हिटी असलेले स्थान आवश्यक असल्याचे स्पष्ट केले होते.

# ‘संकल्प विकासाचा, ज्योत सेवेची’; भोसरीत ‘सेवा ज्योती यात्रा’

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**भारतीय जनता पार्टी, पिंपरी-चिंचवड शहर जिल्ह्याच्या वतीने आयोजित ‘विकसित भारत संकल्प सभा व सेवा ज्योती यात्रा’ भोसरी येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. राष्ट्रविकास, जनसेवा आणि संघटनबळ अधिक मजबूत करण्याचा निर्धार व्यक्त करत भाजपाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी ‘विकसित भारत’ संकल्पनेचा जयघोष केला.**







> ‘विकसित भारत’ ही केवळ संकल्पना न राहता ती प्रत्यक्ष कृतीत उतरविण्याची जबाबदारी प्रत्येक कार्यकर्त्याची आणि नागरिकाची आहे. सेवा, सुशासन आणि विकासाच्या माध्यमातून समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न आपण सातत्याने केला पाहिजे. ‘सेवा ज्योती यात्रा’च्या माध्यमातून राष्ट्रसेवेची भावना अधिक दृढ झाली असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारताच्या संकल्पनेला जनसहभागाची जोड देत विकासाच्या प्रवाहात प्रत्येक घटकाला सहभागी करून घेण्याचा निर्धार आपण करूया. संघटनेची ताकद ही कार्यकर्त्यांच्या एकजुटीत आहे आणि हीच एकजूट राष्ट्रनिर्माणाच्या कार्याला अधिक बळ देईल.”
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न बापू काटे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या संकल्प सभा व यात्रेला पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सेवा, सुशासन आणि विकास या त्रिसूत्रीच्या माध्यमातून समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचण्याचा संदेश यावेळी देण्यात आला. केंद्र व राज्य सरकारच्या विविध विकासाभिमुख योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्यासह राष्ट्रनिर्माणाच्या कार्यात सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन करण्यात आले.

यावेळी भाजपाचे प्रदेश उपाध्यक्ष केशव उपाध्ये यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. संघटन अधिक सक्षम करण्यासोबतच केंद्र आणि राज्य सरकारच्या विकासकामांची माहिती जनतेपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ‘विकसित भारत’ संकल्पनेला जनसहभाग आणि कार्यकर्त्यांच्या सक्रिय योगदानाची जोड देण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

कार्यक्रमास आमदार शंकर जगताप, उमाताई खापरे, अमित गोरखे, महापौर रवी लांडगे, गटनेते प्रशांत शितोळे, सरचिटणीस मोरेश्वर शेडगे, विकास डोळस, मधुकर बच्चे, संजय पटनी, वैशाली खाड्ये, युवा मोर्चा अध्यक्ष दिनेश यादव, महिला मोर्चा अध्यक्ष सुजाता पालांडे, नवनगर विकास प्राधिकरणचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, दक्षिण भारतीय आघाडी प्रभारी राजेश पिल्ले यांच्यासह सर्व मंडलाध्यक्ष, विविध आघाड्यांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

‘सेवा ज्योती यात्रा’च्या माध्यमातून राष्ट्रसेवा, जनसेवा आणि विकासाचा संदेश जनतेपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात आला. कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती आणि उत्स्फूर्त सहभागामुळे भोसरी परिसरात भाजपाच्या संघटनशक्तीचे दर्शन घडले. ‘संकल्प विकासाचा, ज्योत सेवेची आणि ध्यास विकसित भारताचा’ या भावनेतून आयोजित करण्यात आलेली ही यात्रा आगामी काळात संघटन अधिक मजबूत करण्यासाठी कार्यकर्त्यांना नवी ऊर्जा देणारी ठरली.



## भूमिका

**महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कारभाराविरोधात पुण्यात सुरू असलेले विद्यार्थ्यांचे आंदोलन ही केवळ एका अधिकाऱ्याविरोधातील नाराजी नाही, तर संपूर्ण व्यवस्थेवरील अविश्वासाचे प्रतीक आहे. स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे हजारो विद्यार्थी वर्षानुवर्षे मेहनत करतात.**

# ‘लोकसेवा’चा बट्ट्याबोळ; आता सफाईची वेळ!



त्यांचे भविष्य ज्या यंत्रणेच्या निर्णयांवर अवलंबून आहे, त्याच यंत्रणेत वारंवार गोंधळ, विलंब आणि वाद निर्माण होत असतील, तर विद्यार्थ्यांचा संताप स्वाभाविक आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आयोगातील सुधारणांसाठी समिती नेमून सकारात्मक पाऊल उचलले आहे. मात्र, केवळ समित्या नेमणे आणि चौकशीचे आदेश देणे पुरेसे नाही. सुधारणांची सुरुवात ठोस कृतीतून झाली पाहिजे. आयोगाचे प्रमुख विवेक भीमनवार यांच्या राजीनाम्याची मागणी आंदोलक विद्यार्थ्यांनी केली आहे. एखाद्या प्रमुखाच्या राजीनाम्याने सर्व प्रश्न सुटणार नाहीत, हे खरे; पण जबाबदारी निश्चित करण्याच्या दृष्टीने अशा निर्णयाला प्रतीकात्मक महत्त्व असते. व्यवस्थेच्या साफसफाईची सरकारची इच्छा आहे, असा संदेश त्यातून जातो. विशेष म्हणजे आयोगाचे सचिव महेंद्र हरपाळकर यांच्यावर कारवाई करण्याची तत्परता सरकारने दाखवली. मग आयोगाच्या प्रमुखांच्या बाबतीत वेगळी भूमिका का? कनिष्ठ अधिकाऱ्यावर जबाबदारी निश्चित करून वरिष्ठांना मात्र अभय देणे, ही प्रशासनातील विसंगती ठरू शकते. आपल्या राजकीय व्यवस्थेत लहानांवर कारवाई आणि मोठ्यांकडे दुर्लक्ष करण्याची प्रवृत्ती अनेकदा दिसून येते. लोकसेवा आयोगाच्या बाबतीत अशीच परिस्थिती निर्माण होऊ नये.

आयोगाचे प्रमुख स्वायत्त आणि घटनात्मक स्वरूपाच्या पदावर असल्याने त्यांना थेट हटवता येत नाही, हा तांत्रिक मुद्दा असू शकतो. मात्र, त्याचा अर्थ सरकार काहीच करू शकत नाही, असा नाही. आवश्यक घटनात्मक प्रक्रिया राबवून कारवाईचा मार्ग उपलब्ध आहे. त्यामुळे तांत्रिकतेच्या आड लपण्यापेक्षा सरकारने कायद्याच्या चौकटीत राहून ठोस निर्णय घेण्याचे धैर्य दाखवले पाहिजे. लोकसेवा आयोगाच्या इतिहासातही गंभीर गैरप्रकारांवर कारवाई झाल्याची उदाहरणे आहेत. त्यामुळे आजच्या परिस्थितीतही जबाबदारी निश्चित करणे अशक्य नाही. विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित असलेल्या संस्थेचा विश्वास पुन्हा निर्माण करणे ही सरकारची मोठी जबाबदारी आहे.

आज गरज आहे ती केवळ चौकशी समित्यांची नव्हे, तर व्यवस्थात्मक सुधारणांची. परीक्षा वेळेत घेणे, निकाल वेळेत जाहीर करणे, पारदर्शकता वाढवणे आणि विद्यार्थ्यांच्या तक्रारींवर तातडीने निर्णय घेणे, या बाबींना प्राधान्य मिळाले पाहिजे. लोकसेवा आयोगावरील विश्वासाचा प्रश्न आता टाळता येणार नाही. विद्यार्थ्यांचा संयम संपत चालला आहे. त्यामुळे मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासमोर सुधारणा प्रत्यक्षात आणण्याची संधी आहे. काळ आला आहे आणि वेळही आली आहे. आता केवळ आश्वासन नव्हे, तर निर्णायक कृती अपेक्षित आहे.

## प्रासंगिक »

# लहानसा निर्णय

**एका गावात गणू नावाचा कुंभार राहत होता. त्याच्या हातची मडकी गावभर प्रसिद्ध होती. एकदा गावातील श्रीमंत व्यापाऱ्याने त्याला मोठी ऑर्डर दिली. मात्र, मडकी लवकर तयार करण्यासाठी व्यापाऱ्याने गणूला निकृष्ट माती वापरण्याचा सल्ला दिला.**

“वेळ वाचेल आणि नफा वाढेल,” व्यापारी म्हणाला. गणूला क्षणभर मोह झाला; पण त्याने नकार दिला. “माझे मडके विकत घेणारा माणूस माझ्यावर विश्वास ठेवतो. त्या विश्वासाला तडा देऊन मिळालेला पैसा मला नको,” तो म्हणाला.

व्यापारी दुसऱ्या कुंभाराकडे गेला. त्याने स्वस्त माती वापरून मडकी तयार केली. काही दिवसांतच ती मडकी फुटू लागली. ग्राहकांनी व्यापाऱ्याकडे तक्रारी केल्या. दरम्यान, गणूची मडकी मात्र टिकली.

गावकऱ्यांचा त्याच्यावरचा विश्वास आणखी वाढला. काही महिन्यांत त्याला पूर्वीपेक्षा दुप्पट काम मिळू लागले. गणूला समजले की प्रामाणिक निर्णयाचा फायदा लगेच दिसत नसला, तरी त्याची किंमत नक्कीच मिळते.

- तात्पर्य : तात्पुरत्या फायद्यापेक्षा विश्वास आणि गुणवत्ता जपली, तर यश कायमचे मिळते.

पावसाळा संपताच महाराष्ट्रात टँकरच्या फेऱ्या सुरू राहणे आणि ऑक्टोबरमध्येच पाणीकपातीची वेळ येणे, ही येणाऱ्या संकटाची गंभीर चाहूल आहे. हिवाळा सुरू होण्यापूर्वीच उन्हाळ्याची चिंता सतावू लागली आहे.

# पाणीटंचाईची चाहूल, महाराष्ट्रासमोर मोठे संकट



अनेक ठिकाणी डिसेंबर-जानेवारीत जलस्रोत आटण्याची शक्यता आहे. प्रश्न केवळ पिण्याच्या पाण्याचा नाही; तो शेती, रोजगार, अन्नधान्याच्या किमती आणि सामान्य माणसाच्या जगण्याचा आहे. राज्यातील २६५ तालुक्यांत दुष्काळी स्थिती आढळल्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांनी पाणीवापरात किमान दहा टक्के कपात करावी, उद्योगांनी पाण्याचा किमान तीस टक्के पुनर्वापर करावा आणि पिण्याच्या पाण्याला प्राधान्य द्यावे, असे निर्देश देण्यात आले आहेत.

उपलब्ध साठा दीर्घकाळ पुरवण्याचे आव्हान लक्षात घेता हा निर्णय आवश्यक आहे. मात्र, पाणीकपात म्हणजे पाणीव्यवस्थापन नव्हे. वितरणातील गळती, अनधिकृत उपसा आणि असमान पुरवठा रोखल्याशिवाय केवळ नागरिकांच्या नळाला कात्री लावणे हा सोपा उपाय ठरेल. प्रत्येक शहर आणि गावाने किती पाणी उचलले, किती वितरित केले आणि किती वाचवले, याचा पारदर्शक हिशेब सार्वजनिक झाला पाहिजे. ग्रामीण भागातील संकट अधिक गंभीर आहे.

खरीप हातातून गेल्यानंतर रब्बीवर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांना पाण्याची उपलब्धता आधीच स्पष्ट झाली पाहिजे. कोणत्या धरणातून किती पाणी मिळणार, कोणत्या पिकांना परवानगी द्यायची आणि कमी पाण्यातील पिकांसाठी कोणती मदत मिळणार, याबाबत स्पष्ट नियोजन आवश्यक आहे. ठिबक-तुषार सिंचन, बियाणे, कृषी सल्ला आणि फळबागांसाठी स्वतंत्र पाणी नियोजन तातडीने हवे. जनावरांसाठी चारा-पाणी, रोजगार हमीची कामे, पीकविमा आणि दुष्काळी मदत कागदावर न राहता वेळेत पोहोचली पाहिजे. कारण दुष्काळाची झळ सर्वाधिक गरीब कुटुंबांना बसते.

पाणी आणण्यात जाणारा वेळ, रोजगारासाठी होणारे स्थलांतर, वाढता खर्च आणि मुलांच्या शिक्षणावर होणारा परिणाम याकडे दुर्लक्ष करता येणार नाही. उद्योगांसाठी पुनर्वापराची सक्ती करताना सांडपाणी प्रक्रिया केंद्रे पूर्ण क्षमतेने चालवणेही गरजेचे आहे. प्रक्रिया केलेले पाणी उद्योग, बांधकामे आणि उद्यानांसाठी वापरल्यास पिण्याच्या पाण्यावरील ताण कमी होईल. पाऊस किती पडेल हे सरकारच्या हातात नाही; पण उपलब्ध पाण्याचे न्याय्य आणि काटेकोर व्यवस्थापन नक्कीच सरकारच्या हातात आहे. त्यामुळे बैठका, आदेश आणि आवाहनांपलीकडे जाऊन आता प्रत्यक्ष कृतीची वेळ आली आहे. दुष्काळात प्रत्येक थेंब मौल्यवान असतो; त्यामुळे प्रत्येक दिवसाचा विलंबही महागात पडणार आहे.

## ।। अभंगवाणी ।।



भक्ताविण देवा ।
कैंचें रूप घडे सेवा ॥१॥

शोभविलें येर येरां ।
सोनें एके ठायीं हिरा ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# MPSC आंदोलनाची उच्च न्यायालयाकडून दखल

## ‘आंदोलन सोडून अभ्यासाकडे वळा, तुमच्या हिताची काळजी घेऊ’ मुंबई उच्च न्यायालय

**महाईन्यूज । मुंबई**

**राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षेतील (एमपीएससी) अनियमिततेविरोधात पुण्यात विविध ठिकाणी विद्यार्थ्यांकडून करण्यात येणाऱ्या आंदोलनांची मुंबई उच्च न्यायालयाने बुधवारी दखल घेतली. तसेच, विद्यार्थ्यांच्या हिताची आम्हाला काळजी आहे व त्यांच्या मागण्या रास्तही आहेत. परंतु, आठकाठी भूमिका घेऊन व विविध ठिकाणी आंदोलन करून उमेदवारांनी पुणेकरांची गैरसोय करू नये, असे न्यायालयाने म्हटले. तसेच, विद्यार्थ्यांच्या हिताची सर्वतोपरी काळजी घेतली जाईल. त्यामुळे त्यांनी अभ्यसाकडे वळावे, असे आव्हानही न्यायालयाने आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांना केले. त्याचवेळी, आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांच्या मागण्यांबाबत आतापर्यंत काय प्रयत्न केले आणि काय कार्यवाही केली याबाबत प्रतिज्ञापत्राद्वारे भूमिका स्पष्ट करा, असे आदेश न्यायालयाने राज्य सरकारला दिले.**



सरकारी नोकरभरतीसाठीच्या परीक्षा निष्पक्षपणे आणि कोणत्याही गैरप्रकारांशिवाय घेतल्या जातील याची खात्री करणे हे राज्य सरकारचे कर्तव्य आहे, असे मुख्य न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने सरकारला उपरोक्त आदेश देताना नमूद केले. एमपीएससी परीक्षांबाबत पुण्यात सुरू असलेल्या आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर दाखल करण्यात आलेल्या याचिकेवर मुख्य न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखाली सुनावणी झाली. त्यावेळी, एमपीएससीतर्फे घेण्यात येणाऱ्या परीक्षा निष्पक्ष आणि पारदर्शक असतील आणि त्यात कोणतेही गैरप्रकार होणार नाहीत, अशी खात्री राज्य सरकारने द्यायला हवी.

विद्यार्थ्यांचा व्यवस्थेवरील विश्वास पुन्हा निर्माण करण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले जावेत, असे निरीक्षणही मुख्य न्यायमूर्ती महेश चंद्र त्रिपाठी आणि न्यायमूर्ती अद्वैत सेठना यांच्या खंडपीठाने नोंदवले. विद्यार्थ्यांना काही तक्रार असल्यास आंदोलन करण्याचा अधिकार आहे आणि भरती प्रक्रिया पार पडेल याची खात्री करण्याची जबाबदारी राज्य प्रशासनाची आहे, यावरही न्यायालयाने यावेळी भर दिला.

विद्यार्थी आंदोलन करत असतील, तर काही गोष्टींचा विचार करणे आवश्यक आहे. परीक्षा योग्य पद्धतीने होत नसल्याचे आढळल्यास राज्य सरकारने संबंधितांवर कारवाई केली पाहिजे. एमपीएससीतर्फे घेण्यात येणाऱ्या परीक्षा देण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळाली नाही आणि काहीतरी गडबड किंवा गैरप्रकार झाल्याची शंका त्यांना आली, तर त्यांना आंदोलन करण्याचा अधिकार आहे, असे न्यायालयाने प्रामुख्याने नमूद केले.

विद्यार्थ्यांनी या परीक्षांच्या अभ्यासासाठी आपला खूप वेळ दिलेला असतो याकडेही न्यायालयाने लक्ष वेधले. त्यावर, आंदोलकांविरुद्ध पोलिसांनी संयम बाळगला आहे आणि त्यांच्यावर कोणताही गुन्हा दाखल केलेला नाही, अशी माहिती राज्याचे महाधिवक्ता मिलिंद साठ्ये यांनी न्यायालयाला दिली. त्याची दखल घेऊन, न्यायालयाने ते विद्यार्थी असून, समाजकंटक नाहीत, असे म्हटले. तथापि, न्यायालयाने या प्रकरणाची दखल घेतली असल्याने विद्यार्थ्यांनी पुन्हा आपल्या शिक्षणाकडे आणि अभ्यासाकडे वळावे या आवाहनाचा न्यायालयाने पुनरूच्चार केला.

न्यायालयाने आंदोलनाची दखल घेतली आहे आणि विद्यार्थ्यांचा व्यवस्थेवरील विश्वास पुन्हा निर्माण केला जाईल. त्यांच्या तक्रारींचे निवारण केले जावे. परीक्षा मुक्त आणि निष्पक्ष वातावरणात पार पडतील. राज्य सरकार याबाबत काय उपाययोजना करते यावर न्यायालय जातीने लक्ष ठेवेल. आंदोलक विद्यार्थ्यांनी न्यायालयावर विश्वास ठेवावा, असेही न्यायालयाने म्हटले. बहुतेक विद्यार्थ्यांना अभ्यास खरोखरच रस असतो. ते अशा निदर्शनांसाठी येत नाहीत. आंदोलक विद्यार्थ्यांनी आपल्या संबंधित विभागांमध्ये परत जावे, असे आवाहन आम्ही सर्व आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांना करत असल्याचेही न्यायालयाने म्हटले. तुम्हाला शिक्षणासाठी पुण्यात पाठवणाऱ्या तुमच्या पालकांची दयनीय अवस्था पाहा. ही मुले निष्पाप आहेत, पण आता ती रस्त्यावर उतरली आहेत. यामुळे त्यांचे करिअर खराब होईल, असे निरीक्षणही न्यायाधीशांनी नोंदवले.

### मुख्य मागणीबाबत राज्यपालांकडे शिफारस

**पुणे शहरात आंदोलनासाठी विशिष्ट जागा निश्चित कराव्यात आणि विनापरवाना सार्वजनिक जागा व्यापणाऱ्या नेत्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश न्यायालयाने द्यावेत, अशी विनंती याचिकाकर्त्यांनी याचिकेद्वारे केली होती. त्यावर, सरकारने उमेदवारांच्या चारपैकी तीन प्रमुख मागण्या मान्य केल्या. यामध्ये मोठ्या प्रमाणावर पदभरती, परीक्षा शुल्क १०० रुपयांपर्यंत कमी करणे आणि परीक्षा ऑफलाइन पद्धतीने घेणे या गोष्टींचा समावेश असल्याचे महाधिवक्त्यांनी न्यायालयाला सांगितले. एमपीएससी अध्यक्षांच्या राजीनाम्याची शिफारस सरकारतर्फे राज्यपापालांना केली जाईल. त्यानंतर, पुढील कार्यवाही केली जाईल, असेही साठ्ये यांनी न्यायालयाला सांगितले. न्यायालयाने त्याची दखल घेऊन सरकारला याप्रकरणी कृती आराखडा सादर करण्याचे आदेश दिले. त्याचवेळी, चौकशीचे स्वरूप काय आहे आणि आतापर्यंत कोणती कारवाई केली गेली याबाबत सरकारला प्रतिज्ञापत्र दाखल करण्याचेही स्पष्ट केले.**

# अहिल्यानगर जिल्हा बँकेत शंकरराव गडाख, रणजीतसिंह देशमुख बिनविरोध

**महाईन्यूज । अहिल्यानगर**

**जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत संचालक मंडळाच्या २१ जागांपैकी २ जागा बिनविरोध झाल्या आहेत तर आणखी ३ जागा बिनविरोध होण्याच्या मार्गावर आहेत. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत २१ ऑक्टोबर आहे. तोपर्यंत आणखी किती जागा बिनविरोध होतात व किती जागांसाठी निवडणूक होणार हे स्पष्ट होईल. बँकेची निवडणूक बिनविरोध करण्याचे प्रयत्न सुरू आहेत, त्यामुळे उमेदवारी मागे घेण्यासाठी आता नेत्यांची कसोटी लागेल.**



निवडणूक निर्णय अधिकारी तथा सहकार विभागाचे जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे यांनी वैध उमेदवारांची यादी आज, बुधवारी प्रसिद्ध केली. काल, मंगळवारी रात्री उशिरापर्यंत उमेदवारी अर्जांची छाननी व हरकतींवरील सुनावणीची प्रक्रिया सुरू होती. त्यानंतर वैध अर्जांची यादी आज प्रसिद्ध करण्यात आली त्यातून ही बाब स्पष्ट होत आहे.

बिनविरोध निवड झालेल्यांमध्ये ठाकरे गटाचे माजीमंत्री शंकरराव गडाख (नेवासे, सेवा सोसायटी) व काँग्रेसचे माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांचे जावई रणजीतसिंह देशमुख (संगमनेर, सेवा सोसायटी) यांचा समावेश आहे. त्यांचे प्रत्येकी एकमेव अर्ज आहेत तर भाजपचे माजी खासदार डॉ. सुजय विखे (राहाता, सेवा सोसायटी), अजित पवार गटाचे माजी आमदार चंद्रशेखर घुले किंवा त्यांच्या पत्नी तथा जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष राजश्री घुले (शेवगाव, सेवा सोसायटी) व भाजपचे माजी आमदार विवेक कोल्हे किंवा त्यांचे वडील बिपीन कोल्हे (कोपरगाव, सेवा सोसायटी) यांचा बिनविरोध निवडीच्या मार्गावर आहेत.

राहातामध्ये माजी खासदार विखे व त्यांचे समर्थक भास्कर निवृत्ती खर्डे अशा दोघांचेच अर्ज शिल्लक आहेत. खर्डे हे प्रवरा बँकेचे अध्यक्ष आहेत. त्यामुळे त्यांचा उमेदवारी अर्ज मागे घेतला जाण्याची दाट शक्यता आहे. त्यातूनच विखे समर्थकांनी बिनविरोध निवडीचा नगरमध्ये जल्लोष करत फटाके फोडले. शेवगावमध्ये चंद्रशेखर घुले व त्यांच्या पत्नी राज्यश्री घुले अशा दोघांचेच अर्ज शिल्लक आहेत. चंद्रशेखर घुले यांची उमेदवारी कायम ठेवली जाण्याची शक्यता आहे तर राजश्री घुले यांची उमेदवारी मागे घेतली जाण्याची शक्यता आहे. कोपरगावमध्ये बिपिन कोल्हे व त्यांचे चिरंजीव आमदार विवेक कोल्हे अशा दोघांचे अर्ज शिल्लक आहेत. त्यातील बिपिन कोल्हे यांचा अर्ज मागे घेतले जाण्याची दाट शक्यता आहे. आमदार कोल्हे हे बँकेचे माजी संचालक आहेत.

बँकेच्या निवडणुकीसाठी ३६९ उमेदवारी अर्ज दाखल झाले होते. उमेदवारी अर्ज विविध कारणांनी अवैध ठरवणे किंवा हरकतीमुळे बाद ठरवणे तसेच एकाच उमेदवाराने एकापेक्षा अधिक अर्ज दाखल करणे अशा विविध कारणांमुळे आता एकूण २३९ उमेदवार राहिले आहेत. उमेदवारी अर्ज आजपासून मागे घेतले जाण्यास सुरुवात झाली आहे. ती प्रक्रिया २१ तारखेपर्यंत चालेल. या काळात अनेक मतदारसंघात उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी नाट्यमय घडामोडी घडतील.

# राहुल गांधी पुन्हा पोलिसांच्या ताब्यात!

## ज्ञानेश कुमारांच्या राजीनाम्यासाठी विरोधक जंतरमंतरवर आक्रमक

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी विरोधक देशभरात विविध ठिकाणी आंदोलन करत आहेत. इंडिया आघाडीच्यावतीने मंगळवारी दिल्लीत मोर्चा काढण्यात आला होता. त्यानंतर आज (७ ऑक्टोबर) पुन्हा राहुल गांधी यांच्या नेतृत्वात सर्व विरोधी खासदारांनी दिल्लीतील जंतरमंतरवर आंदोलन करण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलिसांनी रोखल्याने मोठा हायव्होल्टेज ड्रामा पाहायला मिळाला आहे.**





एसआयआर प्रक्रियेतील गोंधळाबाबत मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी विरोधक करत आहेत. या पार्श्वभूमीवरच आक्रमक भूमिका घेत सर्व विरोधी पक्षांच्या खासदारांनी आंदोलन केलं आहे. दिल्लीत आज विरोधकांच्या आंदोलनाचा दुसरा दिवस होता. यावेळी दिल्ली पोलिसांनी विरोधकांना जंतरमंतरवर जाण्यापासून रोखल्यानंतर मोठा गोंधळ पाहायला मिळाला आहे.

विरोधी पक्षांच्या सर्व खासदारांनी आज बसेसच्या माध्यमातून जंतरमंतरकडे जाण्याचा प्रयत्न केला. मात्र, विरोधी खासदारांच्या या बसेस पोलिसांनी रोखल्यामुळे राहुल गांधी, मल्लिकार्जुन खर्गे, प्रियांका गांधी यांच्यासह सर्व विरोधी खासदारांनी ठिय्या आंदोलन सुरू केलं. यावेळी खासदारांनी जोरदार घोषणाबाजी केली. त्यामुळे दिल्लीत तणावाचं वातावरण निर्माण झाल्याचं पाहायला मिळालं. यानंतर अखेर राहुल गांधी आणि प्रियांका गांधी यांना दिल्ली पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे.

जंतरमंतरच्या दिशेने जात असलेल्या बसेस पोलिसांनी थांबवल्यानंतर खासदार प्रियांका गांधी या आक्रमक झाल्याच्या पाहायला मिळाल्या. यावेळी प्रियांका गांधी या थेट रस्त्यावर झोपल्या. त्यानंतर पोलिसांनी प्रियांका गांधी यांनाही ताब्यात घेतलं. या सर्व आंदोलनादरम्यान दिल्लीत हायव्होल्टेज ड्रामा पाहायला मिळाला आहे.

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि प्रियांका गांधी यांच्या नेतृत्वात आज इंडिया आघाडीच्या सर्व खासदारांनी दिल्लीत केलेल्या आंदोलनादरम्यान काही काँग्रेसचे कार्यकर्ते बसेसच्या छतावर चढले होते. यावेळी पोलिसांनी त्यांनाही ताब्यात घेतल्याची माहिती समोर आली आहे.

### राहुल गांधींचा सरकारला इशारा

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी एक मोठं वक्तव्य केलं आहे. विरोधी पक्षाच्या खासदारांवर आणि स्वतःवर दाखल झालेल्या एफआयआरबाबत बोलताना राहुल गांधींनी केंद्र सरकारला मोठा इशारा दिला. राहुल गांधी म्हणाले की, "माझ्याविरुद्ध ४५ एफआयआर दाखल झाले आहेत. आता माझी इच्छा आहे की माझ्याविरुद्ध १०० एफआयआर दाखल व्हावेत. कारण प्रत्येक एफआयआर माझ्यासाठी एका मेडलसारखा आहे", असं म्हणत राहुल गांधी यांनी विरोधी पक्षांनी केलेल्या निदर्शनांनंतर विरोधी खासदारांवर दाखल करण्यात आलेल्या एफआयआरला प्रत्युत्तर दिलं आहे.

## हॉर्मुझच्या सामुद्रधुनीतून जाण्यासाठी टँकरच्या कॅप्टनला महिन्याला १ कोटींचे पॅकेज

**महाईन्यूज । इराण**

**हॉर्मुझच्या सामुद्रधुनीतून तेलवाहू टँकर नेण्यास तयार असलेल्या कॅप्टन आणि खलाशांना मोठ्या आर्थिक ऑफर्स दिल्या जात आहेत. फायनान्शिअल टाइम्सच्या रिपोर्टनुसार, काही टँकर कॅप्टनना महिन्याला १ लाख डॉलर सुमारे ९७ लाख रुपये पगार आणि प्रत्येक फेरीसाठी अतिरिक्त ५० हजार डॉलर सुमारे ४८ लाख रुपये बोनस देण्याची तयारी कंपन्यांनी दाखवली आहे. इराणकडून ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ल्यांचा धोका वाढल्याने या महत्त्वाच्या मार्गावरून जहाजे नेण्यासाठी क्रू मिळवणे कंपन्यांसाठी मोठे आव्हान ठरत आहे.**



कॅप्टनपुरताच हा वाढीव मोबदला मर्यादित नाही. साधारणपणे महिन्याला सुमारे दीड हजार डॉलरपासून पगार मिळणाऱ्या खलाशांना हॉर्मुझमधून प्रवास करण्यासाठी नेहमीच्या पगाराच्या ४ ते ६ पट मोबदला दिला जात आहे. कॅप्टनचा नेहमीचा मासिक पगार सुमारे १५ हजार डॉलर असतो. दक्षिण लाल समुद्र आणि ओमानच्या आखातात काम करणाऱ्या क्रूला दुप्पट पगार दिला जात असल्याचेही रिपोर्टमध्ये म्हटले आहे.

हॉर्मुझमध्ये जाण्यास तयार जहाजांची संख्या कमी झाल्याने वाहतूक खर्चात मोठी वाढ झाली आहे. या मार्गावर मालवाहतुकीचा दर दररोज १.३ लाख डॉलरपर्यंत पोहोचला आहे. गेल्या वर्षी हा दर साधारण २० ते ५० हजार डॉलर प्रतिदिन होता. एका सुपरटँकरमध्ये सुमारे २० लाख बॅरल तेल वाहून नेता येते आणि त्यावर ३५ जणांपर्यंत क्रू असू शकतो.

जहाजमालकांना युद्धजोखीम विम्यासाठी जहाजाच्या किमतीच्या ६ ते १० टक्क्यांपर्यंत रक्कम द्यावी लागत आहे. सुपरटँकरसाठी हा खर्च एका फेरीसाठी तब्बल २ कोटी डॉलरपर्यंत जाऊ शकतो. दरम्यान, सुपरटँकरमध्ये वापरल्या जाणाऱ्या इंधनाच्या किमतीतही मोठी वाढ झाली आहे.

भारतीय खलाशांनाही या परिस्थितीचा मोठा फटका बसत आहे. 'फॉरवर्ड सीमेन्स युनियन ऑफ इंडिया'चे सरचिटणीस मनोज यादव यांच्या म्हणण्यानुसार, काही जहाजमालक मोठ्या आर्थिक ऑफर्स देत आहेत, तर काही जण प्रवास नाकारल्यास नोकरी गमावण्याची भीती दाखवत आहेत. "खलाशांचे प्रत्येक बाजूने नुकसान होत आहे. त्यांनी नकार दिला तर नोकरी जाऊ शकते; होकार दिला तर जीव जाऊ शकतो," असे यादव यांनी म्हटले.

### आतापर्यंत ९३ जहाजांवर हल्ले

हॉर्मुझमधील धोका किती मोठा आहे, याची कल्पना हल्ल्यांच्या आकडेवारीवरून येते. आंतरराष्ट्रीय सागरी संघटनेनुसार, २८ फेब्रुवारीपासून आतापर्यंत किमान ९३ जहाजांवर हल्ले झाले असून २४ खलाशांचा मृत्यू झाला आहे. २० सप्टेंबरपासून हल्ल्यांमध्ये आणखी वाढ झाली असून, सागरी सुरक्षा कंपनी 'व्हॅनगार्ड'नुसार या काळात किमान १४ हल्ले झाले आहेत. सुरक्षेच्या कारणास्तव अनेक जहाजे आता रात्रीच्या वेळी हॉर्मुझ पार करत आहेत आणि जीपीएस सिग्नलिंग उपकरणे बंद ठेवत आहेत.



# क्रितीचा ट्रोलर्सना टोला

बॉलिवूड अभिनेत्री क्रिती सनॉन काही काळापूर्वी एका ज्वेलरी ब्रँडच्या जाहिरातीमुळे चर्चेत आली होती. रक्षाबंधनाच्या निमित्ताने प्रदर्शित झालेल्या या जाहिरातीवरून सोशल मीडियावर मोठा वाद निर्माण झाला होता. नेटकऱ्यांसह विविध क्षेत्रातील काही व्यक्तींनी क्रितीच्या जाहिरातीतील लूकवर सडकून टीका केली होती. आता या संपूर्ण प्रकरणावर क्रितीने एका रियालिटी शोमध्ये भाष्य करत एक बेधडक वक्तव्य केले आहे. अभिनेत्री करीना कपूर खानच्या 'व्हॉट वुमन वॉन्ट' या शोमध्ये क्रिती सहभागी झाली होती. यावेळी जाहिरातीवरून झालेल्या ट्रोलिंगबाबत तिने आपली भूमिका मांडली. जाहिरातीतील आपल्या कपड्यांवरून झालेल्या चर्चेचा संदर्भ देत क्रिती म्हणाली, "मला विश्वासच बसत नाही की माझा ब्लाऊज प्राईम टाइमवर सहा लोकांच्या पॅनलचा चर्चेचा विषय ठरला." रक्षाबंधनाच्या निमित्ताने प्रदर्शित झालेल्या या जाहिरातीमध्ये क्रिती इंडो-वेस्टर्न लूकमध्ये दिसली होती. जाहिरातीमध्ये ती आपल्या भावाला आणि पाळीव कुत्र्याला राखी बांधून सण साजरा करताना दाखवण्यात आली होती. ही जाहिरात सोशल मीडियावर समोर आल्यानंतर तिच्या कपड्यांवरून काही नेटकऱ्यांनी आक्षेप घेतला. 'भारतीय संस्कृतीत सणाच्या दिवशी असे कपडे कोण घालतं?' तसेच 'भावाला राखी बांधताना अशा प्रकारचा पोशाख का?' अशा स्वरूपाच्या प्रतिक्रिया सोशल मीडियावर पाहायला मिळाल्या. दुसरीकडे, अनेकांनी क्रितीची बाजू घेत तिच्या कपड्यांवरून तिला ट्रोल करणे चुकीचे असल्याचे म्हटले. या संपूर्ण वादाच्या पार्श्वभूमीवर क्रितीने महिलांच्या कपड्यांबाबत होणाऱ्या चर्चेवरही प्रश्न उपस्थित केला. एखादी महिला काय घालते आणि काय घालत नाही, हा तिच्या वैयक्तिक स्वातंत्र्याचा भाग आहे, असे ती म्हणाली.



# 'रिपोर्टिंग लाइव'मध्ये परिणिती चोप्रा

अभिनेत्री परिणिती चोप्राची शक ही वेबसीरिज अलिकडेच ओटीटीवर प्रदर्शित झाली आहे. या सीरिजला प्रेक्षकांची पसंती लाभत आहे. तर आता तिचा नवा चित्रपट जाहीर झाला असून याचे नाव रिपोर्टिंग लाइव असणार आहे. या चित्रपटाच्या फर्स्ट लुक पोस्टरसोबत त्याच्या प्रदर्शनाची तारीख जाहीर करण्यात आली आहे. नेटफ्लिक्सवर हा चित्रपट 9 ऑक्टोबर रोजी प्रदर्शित होणार आहे. रिपोर्टिंग लाइव हा चित्रपट ऑनलाइन स्ट्रीम करण्यात येणार आहे. या चित्रपटात परिणिती ही संध्या नावाच्या महिला पत्रकाराची भूमिका साकारताना दिसून येणार आहे. यात ती स्वत:च्या कॅमेरामनसोबत मिळून अवैध वाळू उपसा करणाऱ्या माफियांचा पर्दाफाश करताना दिसून येणार आहे. हा एक प्रकारचा इन्व्हेस्टिगेटिव्ह थ्रिलर धाटणीचा चित्रपट असणार आहे. या चित्रपटाची निर्मिती पार्थ ठाकूर आणि जोशुआ शिरसाट यांनी केली आहे. तर याचे दिग्दर्शन आणि लेखनाची जबाबदारी ध्रूव त्रिपाठी आणि मिहिर जाधव यांनी सांभाळली आहे. या चित्रपटात परिणितीसोबत देवेन भोजानी, अमोल पालेकर, आदिल हुसैन, शेखर सुमन हे कलाकार दिसून येणार आहेत.

# कियारा -सिद्धार्थ दुसऱ्यांदा आई-बाबा होणार

बॉलीवूड अभिनेत्री कियारा अडवाणी व अभिनेता सिद्धार्थ मल्होत्रा दुसऱ्यांदा आई-बाबा होणार आहेत. अभिनेत्रीने खास पोस्ट शेअर करत ही गुडन्यूज सर्वांना दिली आहे. सिड-कियारा लवकरच त्यांच्या दुसऱ्या बाळाचं स्वागत करणार आहेत.

कियारा अडवाणी पोस्ट शेअर करत लिहिते, "पुन्हा एकदा आमच्या आयुष्यात खास क्षण आलाय, तुमचे आशीर्वाद असेच कायम राहूद्यात. आमचं मन आज प्रेम अन् कृतज्ञतेने भरून गेलंय."

कियाराने शेअर केलेल्या फोटोमध्ये लहान बाळाचे मोजे अन् त्यावर तिच्या लेकीने म्हणजेच सरायाहने हात ठेवल्याचं पाहायला मिळत आहे. सरायाहचा जन्म १५ जुलै २०२५ रोजी झाला होता. लेकीच्या जन्मानंतर वर्षभरातच कियारा पुन्हा एकदा आई होणार आहे. अभिनेत्रीने ही गुडन्यूज शेअर करताच चाहत्यांसह बॉलीवूड कलाकारांनी तिच्यावर कौतुकाचा वर्षाव केला



आहे. करण जोहर, भूमी पेडणेकर, करीना कपूर, अथिया शेट्टी, पत्रलेखा या सगळ्याच कलाकारांनी कियाराला शुभेच्छा दिल्या आहेत. सिद्धार्थ-कियाराबद्दल सांगायचं झालं, तर या दोघांची पहिली भेट एका पार्टीदरम्यान झाली होती. यानंतर दोघांनी 'शेरशाह' सिनेमात एकत्र काम केलं. याच चित्रपटाच्या सेटवर सिड-कियाराच्या लव्हस्टोरीची खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. ७ फेब्रुवारी २०२३ रोजी या जोडप्याने राजस्थानमधील जैसलमेर येते थाटामाटात लग्न केलं होतं. सूर्यगढ पॅलेसमध्ये त्यांचा शाही लग्नसोहळा पार पडला होता.

सिद्धार्थ व कियाराने लग्नानंतर अडीच वर्षांनी पहिल्या बाळाचं स्वागत केलं. कियारा अडवाणीने १५ जुलै २०२५ गोंडस मुलीला ( सरायाह ) जन्म दिला. आता लवकरच त्यांच्या घरी दुसऱ्या बाळाचं आगमन होणार आहे. सध्या संपूर्ण कलाविश्वातून या जोडप्यावर शुभेच्छांचा वर्षाव करण्यात येत आहे.

# हरमनप्रीत कौरचा कर्णधारपदावरून पायउतार

## स्वेच्छेने नेतृत्व सोडले की, 'बीसीसीआय'ने भाग पाडले ? संघाला नव्या नेतृत्वाची आवश्यकता

**महाईन्यूज । मुंबई**

**भारताला महिला क्रिकेटमध्ये ऐतिहासिक विश्वचषक जिंकून देणारी कर्णधार हरमनप्रीत कौरने मंगळवारी तिन्ही प्रकारांतील (कसोटी, वन-डे आणि टी-२०) कर्णधारपदाचा राजीनामा दिला. मात्र, यानंतर तिने नेतृत्वावरून स्वेच्छानिवृत्ती घेतली की यामागे 'बीसीसीआय'ची रणनीती आहे, यावरून वादंग निर्माण झाले. संघाला नव्या नेतृत्वाची आवश्यकता असल्याची मंडळाची भूमिका होती. त्यावरून हरमनप्रीतने हा निर्णय घेतल्याचे प्रातिनिधिक चित्र आहे.**




एक कर्णधार म्हणून आपली जबाबदारी पूर्ण झाली असून, आता खेळावरील प्रेमापोटी केवळ एक खेळाडू म्हणून आपण सज्ज असल्याचे हरमनप्रीतने एका इन्स्टाग्राम पोस्टद्वारे स्पष्ट केले. ऐतिहासिक लॉर्ड्स् क्रिकेट मैदानावरील आपल्या छायाचित्रासह तिने ही पोस्ट शेअर केली.

गेल्या काही काळापासून खराब फॉर्मचा सामना करत असलेली हरमनप्रीत कर्णधारपद सोडले तरी ती एक खेळाडू म्हणून भारताचे प्रतिनिधित्व करत राहणार आहे. हरमनप्रीतने एकूण ५ कसोटी, ५१ एकदिवसीय आणि १५५ टी-२० सामन्यांमध्ये भारताचे नेतृत्व केले.

संघाच्या कामगिरीचा आढावा घेण्यासाठी गुवाहाटी येथे 'बीसीसीआय'ची एक बैठक सचिव देवजित सैकिया यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. हरमनप्रीतसह उपकर्णधार स्मृती मानधना आणि मुख्य प्रशिक्षक अमोल मुजुमदार उपस्थित होते. याचवेळी 'बीसीसीआय'ने हरमनप्रीतला स्पष्ट केले की, भविष्याचा विचार करता संघात नेतृत्वात बदल करणे आवश्यक असून, निवड समितीही नव्या नेतृत्वाच्या बाजूने आहे. हरमनप्रीतने टी-२० मधील आपली फलंदाजी अपेक्षेप्रमाणे झाली नसल्याचे मान्य केले आणि नव्या पिढीला संधी देण्यासाठी बाजूला होणे योग्य ठरेल, अशी भूमिका घेतली. असे असले तरी, कसोटी आणि एकदिवसीय क्रिकेटचे कर्णधारपद आपल्याकडेच राहावे, अशी तिची इच्छा होती; तर 'बीसीसीआय' मात्र तिन्ही प्रकारांत संपूर्ण नेतृत्वबदलाच्या भूमिकेवर ठाम होते. अखेर हरमनप्रीतने मंडळाचा हा निर्णय स्वीकारला आणि अधिकृतपणे हा तिचा स्वतःचा निर्णय असल्याचे जाहीर केले.

कर्णधार हरमनप्रीतची जागा घेण्यासाठी स्मृती मानधना एक प्रबळ दावेदार म्हणून पुढे येऊ शकते. गरज भासली तेव्हा मानधनाने अत्यंत कौतुकास्पद पद्धतीने कर्णधारपदाची धुरा सांभाळली होती. तसेच, गेल्या तीन हंगामांत रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूला दोन डब्ल्यूपीएल विजेतेपदेही जिंकून दिली. अगदी दशकभरापूर्वी मिताली राज नेतृत्व सांभाळत असताना हरमनप्रीतही अशाच भूमिकेत होती, हा ही एक योगायोगच! मिताली राजच्या दुखापतीमुळे हरमनप्रीतने टी-२० आशिया चषक फायनलमध्ये पहिल्यांदाच नेतृत्व सांभाळले. पूर्णवेळ कर्णधार म्हणून पहिल्याच टी-२० विश्वचषकात भारताला उपांत्य फेरीपर्यंत पोहोचवले.

### स्मृती मानधना नवी कर्णधार

यादरम्यान, 'बीसीसीआय'ने भारतीय महिला क्रिकेट संघाच्या कर्णधारपदाची धुरा धडाकेबाज फलंदाज स्मृती मानधना हिच्या खांद्यावर सोपवली आहे. 'बीसीसीआय'ने प्रसिद्धीपत्रकाद्वारे स्मृतीच्या निवडीची घोषणा केली. गेल्या अनेक वर्षांपासून भारतीय महिला क्रिकेटमधील आघाडीचा चेहरा राहिलेल्या स्मृतीने सर्वच क्रिकेट प्रकारांमध्ये संघाच्या यशात सातत्याने मोलाची भूमिका बजावली आहे.
'बीसीसीआय'ने भारतीय महिला क्रिकेट संघाच्या कर्णधारपदाची धुरा धडाकेबाज फलंदाज स्मृती मानधना हिच्या खांद्यावर सोपवली आहे. 'बीसीसीआय'ने प्रसिद्धीपत्रकाद्वारे स्मृतीच्या निवडीची घोषणा केली.

# ‘इतर खेळाडूंनाही यातून प्रेरणा मिळेल’; भुवनेश्वर कुमारचे तब्बल चार वर्षांनंतर पुनरागमन

**महाईन्यूज । मुंबई**

**माजी भारतीय कर्णधार कपिल देव यांनी अनुभवी वेगवान गोलंदाज भुवनेश्वर कुमारच्या भारतीय टी-२० संघात झालेल्या पुनरागमनाचे जोरदार स्वागत केले आहे. सातत्यपूर्ण मेहनत आणि उत्कृष्ट फिटनेसच्या जोरावर कोणत्याही खेळाडूची संघात वापसी होऊ शकते, हेच भुवीने सिद्ध केले असून यातून इतर खेळाडूंनाही मोठी प्रेरणा मिळेल.**



जेपी ग्रीन्स गोल्फ अँड स्पा रिसॉर्ट येथे आयोजित ‘कपिल देव इन्व्हिटेशनल टूर चॅम्पियनशिप’वेळी माध्यमांशी बोलताना कपिल देव म्हणाले, "भारतीय संघातून बाहेर पडल्यानंतर भुवीने प्रचंड मेहनत घेतली. स्वतःच्या फिटनेसवर विशेष लक्ष केंद्रित केले. सतत गोलंदाजीचा सराव सुरू ठेवला; याच जिद्दीच्या बळावर त्याने राष्ट्रीय संघात पुन्हा स्थान मिळवले आहे. इच्छाशक्ती आणि मेहनत असेल तर पुनरागमन अशक्य नाही, हाच धडा त्याच्या या प्रवासातून इतर खेळाडूंना मिळेल." भुवनेश्वरने भारतासाठी आतापर्यंत २१ कसोटी, १२१ एकदिवसीय आणि ८७ टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळले असून टी-२० मध्ये त्याच्या नावावर ९० बळी नोंद आहेत.

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) न्यूझीलंड दौऱ्यासाठी भारतीय संघाची घोषणा केली आहे. या दौऱ्यात भारत आणि न्यूझीलंड यांच्यात पाच सामन्यांची टी-२० मालिका रंगणार आहे. ही मालिका २२ ऑक्टोबरपासून सुरू होऊन १ नोव्हेंबरपर्यंत चालणार आहे. मालिकेतील पहिला आणि दुसरा सामना ख्राइस्टचर्च येथे खेळवला जाणार आहे. त्यानंतर तिसरा सामना वेलिंग्टन, तर चौथा सामना ऑकलंड येथे होणार आहे.

मालिकेतील अखेरचा आणि पाचवा टी-२० सामना १ नोव्हेंबर रोजी हॅमिल्टन येथे होणार आहे. पहिला सामना २२ ऑक्टोबर, दुसरा २४ ऑक्टोबर, तिसरा २७ ऑक्टोबर आणि चौथा सामना ३० ऑक्टोबर रोजी होईल. न्यूझीलंडच्या परिस्थितीत भारतीय संघाच्या कामगिरीकडे क्रिकेट चाहत्यांचे विशेष लक्ष असणार आहे. पाच सामन्यांच्या या मालिकेमुळे दोन्ही संघांना आगामी टी-२० स्पर्धांसाठी तयारीची चांगली संधी मिळणार आहे.

### न्यूझीलंड दौऱ्यात भुवनेश्वरला स्थान

न्यूझीलंड दौऱ्यासाठी जाहीर करण्यात आलेल्या भारतीय टी-२० संघात भुवनेश्वरला स्थान देण्यात आले आहे. नोव्हेंबर २०२२ मध्ये न्यूझीलंडविरुद्ध तो आपला शेवटचा आंतरराष्ट्रीय टी-२० सामना खेळला होता. हाच त्याचा भारतासाठीचा अखेरचा सामना ठरला होता. भारतीय संघातून बाहेर असतानाही भुवनेश्वरने खचून न जाता देशांतर्गत क्रिकेट आणि आयपीएलमध्ये चमकदार कामगिरी सुरूच ठेवली. गेल्या दोन आयपीएल हंगामात त्याने आपल्या गोलंदाजीची छाप पाडली. नुकत्याच पार पडलेल्या यूपी टी-२० लीगमध्ये भुवीने ११ डावांमध्ये अवघ्या ६.११ च्या इकॉनॉमीने आणि १६.०० च्या सरासरीने १४ बळी टिपत निवडकर्त्यांचे लक्ष वेधून घेतले होते.

स्मार्ट PCMC
SMART CITY
महाईन्यूज ™
epaper.mahaenews.com
ePaper
। गुरुवार ।
दि. 08 ऑक्टोबर 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती



# देहूगावात रस्त्याच्या प्रश्नावरून नागरिक आक्रमक

## लोकप्रतिनिधींचे सत्कार रोखण्याचे अनिरुद्ध काळोखे यांचे आवाहन; सत्ता असूनही आश्वासनांची पायमल्ली!

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**कंद पाटील नगर ते बायपास रोड या प्रलंबित रस्त्याच्या कामावरून देहूगावातील नागरिकांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. स्थानिक लोकप्रतिनिधींनी आजवर केवळ आश्वासने देऊन वेळ मारून नेल्याचा घणाघाती आरोप नागरिकांनी केला आहे. या पार्श्वभूमीवर भीमाशंकर मंदिर येथे नागरिकांची एक महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.**



स्थानिक पातळीवर होत असलेल्या दिरंगाईबद्दल बोलताना काळोखे म्हणाले, "स्थानिक लोकप्रतिनिधींकडून नागरिकांना केवळ आश्वासनांचे गाजर दाखवले जात आहे. प्रत्यक्षात रस्त्याचे काम ठप्पच आहे. भारतीय जनता पक्षाच्या वतीने मी नागरिकांना शब्द देतो की, आपण या प्रश्नासंदर्भात लवकरच मा. मुख्यमंत्री साहेबांची वेळ घेऊन भेट घेणार आहोत आणि हा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावणार आहोत. नागरिकांना कोणत्याही परिस्थितीत वाऱ्यावर सोडले जाणार नाही."

अनिरुद्ध काळोखे यांच्या या आक्रमक आणि सकारात्मक भूमिकेमुळे उपस्थित नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. आता लवकरच मुख्यमंत्र्यांकडे या प्रश्नाचा पाठपुरावा केला जाणार असल्याने देहूगावातील या प्रलंबित रस्त्याचा प्रश्न मार्गी लागतो का, याकडे संपूर्ण ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

### जोपर्यंत रस्ता होत नाही, तोपर्यंत सत्कार बंद!

या बैठकीत भाजप युवा मोर्चा अध्यक्ष अनिरुद्ध काळोखे यांनी नागरिकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहत आपली भूमिका मांडली. "केवळ आश्वासनांनी नागरिकांचे प्रश्न सुटणार नाहीत, तर प्रत्यक्ष कृती झाली पाहिजे," असा ठाम इशारा त्यांनी दिला. तसेच, "जोपर्यंत या रस्त्याचा प्रश्न प्रत्यक्ष निकाली निघत नाही, तोपर्यंत नागरिकांनी एकाही लोकप्रतिनिधीचा सत्कार करू नये," असे जाहीर आवाहन काळोखे यांनी उपस्थितांना केले.

### सत्ता असूनही आश्वासनांची पायमल्ली!

निवडणुकीच्या वेळी "आम्हाला निवडून द्या, सहा महिन्यांत रस्ता करून देतो," असा शब्द स्थानिक आमदार आणि नगरसेवकांनी नागरिकांना दिला होता. सध्या आमदार त्यांचाच असून नगरपंचायतीमध्ये सर्व नगरसेवक आणि सत्ताही त्यांचीच आहे. तरीही अद्याप रस्त्याचे काम पूर्ण झाले नसल्याने नागरिकांनी बैठकीत तीव्र संताप व्यक्त केला. लोकप्रतिनिधींनी नागरिकांची निव्वळ फसवणूक केल्याची भावना ग्रामस्थांमध्ये निर्माण झाली आहे.

# चाकणपाठोपाठ थेऊर येथेही 'पीएमआरडीए' उभारणार घनकचरा प्रकल्प

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**चाकण औद्योगिक वसाहतीतील प्रलंबित घनकचरा प्रकल्पाच्या निर्णयानंतर आता पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) हवेली तालुक्याच्या पूर्व भागातील कचराकोंडी फोडण्यासाठी मोठे पाऊल उचलले आहे. थेऊर आणि परिसरातील १३ गावांसाठी (एकूण १४ ग्रामपंचायती) मध्यवर्ती घनकचरा प्रक्रिया प्रकल्प उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी थेऊर येथील पीएमआरडीएची १० एकर गायरान जागा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.**




### चाकणपाठोपाठ पूर्व हवेलीलाही दिलासा

चाकण एमआयडीसी परिसरातील १९ ग्रामपंचायती व दोन नगरपरिषदांसाठी पीएमआरडीएकडून मध्यवर्ती घनकचरा प्रक्रिया प्रकल्प उभारण्याची प्रक्रिया सुरू झाल्यानंतर आता थेऊर परिसरासाठी हा दुसरा मोठा प्रकल्प जाहीर करण्यात आला आहे. यामुळे पीएमआरडीएच्या दोन्ही औद्योगिक व निमशहरी पट्ट्यांमधील पुढील ३० वर्षांच्या कचरा व्यवस्थापनाचा आराखडा अधिक स्पष्ट झाला आहे.

सन २०४३ मधील संभाव्य लोकसंख्या गृहीत धरून १५० टीपीडी (टन प्रतिदिन) क्षमतेचा हा प्रकल्प उभारला जाणार आहे. या प्रकल्पाच्या नियोजनाबाबत पीएमआरडीएच्या आकुर्डी येथील मुख्यालयातील छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात आज (दि. ६ ऑक्टोबर) शिरूर-हवेलीचे आमदार ज्ञानेश्वर कटके यांच्या उपस्थितीत आणि महानगर आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली विशेष आढावा बैठक पार पडली. या बैठकीला अतिरिक्त महानगर आयुक्त के. मंजुलक्ष्मी, मुख्य अभियंता (विशेष प्रकल्प) रिनाज पठाण, कार्यकारी अभियंता अनिता कुलकर्णी, उपअभियंता रितेश मुंढे, उपअभियंता अरविंद सिद्राल, जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी भूषण जोशी, हवेलीचे गट विकास अधिकारी शेखर शेलार यांच्यासह संबंधित १४ गावांचे सरपंच, प्रशासक व विस्तार अधिकारी उपस्थित होते.

थेऊर (ता. हवेली) येथील उपलब्ध गायरान क्षेत्रापैकी १० एकर जागा या घनकचरा प्रकल्पासाठी उपलब्ध करून दिली जाणार असल्याचे महानगर आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी स्पष्ट केले. सन २०४३ मधील संभाव्य लोकसंख्या लक्षात घेऊन १५० टीपीडी क्षमतेचा प्रकल्प कार्यान्वित करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. सदर योजनेनुसार, प्रकल्पस्थळापासून २० किलोमीटर अंतराच्या आतील सहभागी ग्रामपंचायतींनी आपापल्या कार्यक्षेत्रातील कचरा संकलित करून तो या प्रकल्पस्थळी आणून देणे अपेक्षित आहे. त्यावर शास्त्रोक्त प्रक्रिया करण्यासाठी निश्चित केलेली 'टिपिंग फी' संबंधित ग्रामपंचायतींना भरावी लागणार आहे. तसेच, या प्रकल्पात सहभागी होण्यासाठी संबंधित ग्रामपंचायतींकडून ठराव मागविण्यात आले आहेत.

या प्रकल्पामुळे पूर्व हवेलीतील १४ ग्रामपंचायतींच्या कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागणार आहे. त्यामध्ये थेऊर, लोणी काळभोर, कदमवाकवस्ती, केसनंद, वाडेबोल्हाई, उरुळी कांचन, साष्टे, कोरेगाव मूळ, सोरतापवाडी, आळंदी म्हातोबाची, नायगाव प्रयागधाम, शिंदवणे, पेठ आणि कोळवडी या गावांचा समावेश आहे.

आमदार ज्ञानेश्वर कटके यांनी 'पीएमआरडीए'ने हा प्रकल्प हाती घेतल्याबद्दल प्रशासनाचे अभिनंदन केले. "ज्या ग्रामपंचायतींची आर्थिक स्थिती कमकुवत आहे, त्यांना कचरा वाहतुकीसाठी जिल्हा परिषद आणि जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून घंटागाड्या उपलब्ध करून देण्यासाठी आपण विशेष प्रयत्न करू," अशी ग्वाही त्यांनी दिली. तसेच, या भागातील लगतच्या इतर ग्रामपंचायतींनीही या प्रकल्पात सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

# राष्ट्रीय थाई किकबॉक्सिंग स्पर्धेत महाराष्ट्राचा डंका!

## राष्ट्रीय विजेतेपदासह 5 टायटल बेल्टवर कोरले नाव; कर्नाटक संघ उपविजेता

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

**इंडिया थाई किकबॉक्सिंग फेडरेशनतर्फे आयोजित ३री राष्ट्रीय थाई किकबॉक्सिंग चॅम्पियनशिप व टायटल बेल्ट स्पर्धा गोव्यात मोठ्या उत्साहात पार पडली. पेडेम स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स, मापुसा येथील बॉक्सिंग हॉलमध्ये २ ते ४ ऑक्टोबर दरम्यान रंगलेल्या या स्पर्धेत महाराष्ट्र संघाने अष्टपैलू कामगिरीच्या जोरावर राष्ट्रीय विजेतेपद (जनरल चॅम्पियनशिप) पटकावले, तर कर्नाटक संघ उपविजेता ठरला.**




स्पर्धेचे उद्घाटन गोवा शासनाच्या क्रीडा व युवा व्यवहार विभागाचे उपसंचालक डॉ. विवेक पवार यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी इंडिया थाई किकबॉक्सिंग फेडरेशनचे अध्यक्ष संतोष म्हात्रे आणि अवकारिका फाउंडेशनचे संचालक सी.ए. अरविंद भोसले यांची प्रमुख उपस्थिती होती.

या सोहळ्यास रोहित पवार, योगेश कवळे, ग्रँडमास्टर समीर पांढरकर, अविनाश पवार, अभिषेक शहा, किरण माने, अमित पाल, तेजल पवार, ओम पांढरकर, सेजल पवार, नितीन शहा, कुणाल जोगदंड, आदित्य अडागळे आणि वैशणवी भागवत यांसह विविध मान्यवर, प्रशिक्षक व अधिकारी उपस्थित होते.

> ”खेळाडूंना दर्जेदार राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय व्यासपीठ मिळवून देणे आणि थाई किकबॉक्सिंग खेळ देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचवणे हेच फेडरेशनचे मुख्य उद्दिष्ट आहे. सर्व विजेत्यांचे व सहभागी खेळाडूंचे मनःपूर्वक अभिनंदन!”
> **- संतोष म्हात्रे, अध्यक्ष, इंडिया थाई किकबॉक्सिंग फेडरेशन.**

स्पर्धेचे सामने सुरळीत पार पाडण्यासाठी अभिषेक शहा यांनी रिंग इन्चार्ज, अविनाश पवार यांनी टेक्निकल डायरेक्टर आणि समीर पांढरकर यांनी चॅम्पियनशिप सेक्रेटरी म्हणून जबाबदारी सांभाळली. किरण माने, अमित पाल, आदित्य अडागळे, तेजल पवार आणि ओम पांढरकर या पंचांनी निष्पक्षपणे काम पाहिले.

### राष्ट्रीय टायटल बेल्ट विजेते

- महिला–५५ किलोसायली घोडके महाराष्ट्र
- महिला–६५ किलो वैशणवी भागवत महाराष्ट्र
- महिला+६५ किलो शरयू संतोष म्हात्रे महाराष्ट्र
- पुरुष–४५ किलो आनंद लांडगे महाराष्ट्र
- पुरुष–५५ किलो प्रतीक लांबडे महाराष्ट्र
- पुरुष–६५ किलो वैशांक प्रदीप कर्नाटक
- पुरुष–७५ किलो केशव गौतम कर्नाटक
- पुरुष+७५ किलो कुणाल जोगदंड महाराष्ट्र

## ‘विद्या-सेतू’ उपक्रमांतर्गत जिल्हा परिषद शाळांतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**महाईन्यूज ।**
**पिंपरी-चिंचवड**

**येथील एमआयटी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या विज्ञान व संगणकशास्त्र विभागाच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत ‘विद्या-सेतू’ या समाजोपयोगी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांतर्गत शैक्षणिक साहित्य संकलन मोहीम राबवून जिल्हा परिषद शाळांमधील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा उत्साहात पार पडला.**



या उपक्रमांतर्गत चिंबळी व पाचवड केंदूर येथील जिल्हा परिषद शाळांना भेट देऊन तेथील एकूण २५ गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष गौरव करण्यात आला. या गुणवंत विद्यार्थ्यांना पुस्तके, वह्या, लेखन साहित्य तसेच चित्रकलेचे साहित्य भेटस्वरूपात देण्यात आले. ग्रामीण भागातील होतकरू विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्याची मदत व्हावी आणि त्यांच्यातील गुणवत्तेला प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने हा उपक्रम राबवण्यात आला. कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन व आयोजन सहायक प्राध्यापिका सौ. मोनिका उगले आणि सौ. कविता सांडभोर यांनी केले. हा उपक्रम विभागप्रमुख डॉ. संगीता बोर्डे व महाविद्यालयाचे संचालक प्रा. डॉ. बी.बी. वाफारे यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पडला. यासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील गुणवंत विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी नवी ऊर्जा मिळाली असून, महाविद्यालय व परिसरातील शाळांमधील शैक्षणिक व सामाजिक स्नेहबंध अधिक दृढ झाले आहेत. सामाजिक बांधिलकी जपत राबविलेल्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

## राजमाता जिजाऊ महाविद्यालयाचे आंतर-महाविद्यालयीन ग्रीको-रोमन कुस्ती स्पर्धेत वर्चस्व

**महाईन्यूज ।**
**पिंपरी-चिंचवड**

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समिती आणि एम. एस. काकडे महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने सोमेश्वरनगर येथे आयोजित आंतर-महाविद्यालयीन ‘ग्रीको-रोमन कुस्ती स्पर्धेत’ राजमाता जिजाऊ महाविद्यालयाने चमकदार कामगिरी करत विजेतेपदावर आपले नाव कोरले.**



या खेळाडूंनी मिळवलेल्या ५ पदकांच्या जोरावर राजमाता जिजाऊ महाविद्यालयाने संपूर्ण स्पर्धेचे विजेतेपद पटकावले.

विद्यार्थ्यांच्या या घवघवीत यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष व भोसरी विधानसभेचे प्रथम आमदार श्री. विलास लांडे, सचिव श्री. सुधीर मुंगसे, खजिनदार श्री. अजित गव्हाणे, विश्वस्त श्री. विक्रांत लांडे, प्रभारी प्राचार्य प्रा. किरण चौधरी आणि रजिस्ट्रार सौ. अश्विनी भोसले यांनी सर्व विजेते खेळाडू तसेच क्रीडा संचालक डॉ. गणेश चव्हाण यांचे विशेष कौतुक व अभिनंदन केले. महाविद्यालयाच्या या यशामुळे क्रीडा वर्तुळातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### पदकांची कमाई

- प्रणव लांडगे (६० किलो) – सुवर्णपदक
- पार्थ कंधारे (६७ किलो) – सुवर्णपदक
- सारंग बोराडे (५७ किलो) – रौप्यपदक
- सिद्धांत बांगर (५५ किलो) – कांस्यपदक
- यश आढाव (७९ किलो) – कांस्यपदक

# पिंपरी-चिंचवडच्या कराटेपटूंची आंतरराष्ट्रीय स्पर्धेत दमदार कामगिरी

## स्पर्धेत भारत, जपान, भूतान, मलेशिया आणि श्रीलंका या देशांतील कराटेपटूंचा सहभाग

**महाईन्यूज ।**
पिंपरी- चिंचवड

**मुंबई येथील मिहिर सेन स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स, ठक्कर मॉलसमोर, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, मीरा रोड क्रिडा संकुलन महाराष्ट्र येथे रविवार, दि. ४ ऑक्टोबर २०२६ रोजी 6th Shotokan Cup International Level Karate Tournament 2026 या आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.**






ही स्पर्धा International Shotokan Karate-Do Organization (I.S.K.O.) यांच्या वतीने WUSU International Martial Arts Association यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आली होती. या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भारत, जपान, भूतान, मलेशिया आणि श्रीलंका या देशांतील कराटेपटूंनी सहभाग घेतला.

या स्पर्धेत पिंपरी-चिंचवड शहरातील खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत २९ सुवर्ण, १८ रौप्य आणि १५ कांस्यपदके, अशी एकूण ६२ पदके पटकावून शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला.

यामध्ये पिंपरी-चिंचवड येथील कु. गौरांगी गौरव गायकवाड हिने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत रौप्यपदक व कांस्यपदक अशी दोन पदके मिळवली. तिच्या या यशाबद्दल पालक, प्रशिक्षक व कुटुंबीयांकडून तिचे कौतुक व अभिनंदन होत आहे.

स्पर्धेत Kata व Kumite या दोन्ही प्रकारांचा समावेश होता. WUSU International Martial Arts Associationच्या प्रशिक्षक निशा गुप्ता मॅडम व आशितोष दौडकर सर यांनी सहभागी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन, प्रशिक्षण तसेच स्पर्धेसाठी आवश्यक प्रात्यक्षिक व परीक्षण दिले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली पिंपरी-चिंचवडमधील खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी केली. लहान वयातच कराटेसारख्या क्रीडा प्रकारात विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश कौतुकास्पद असून, त्यांच्या कामगिरीमुळे पिंपरी-चिंचवड शहरातील इतर विद्यार्थ्यांनाही क्रीडा क्षेत्रात पुढे येण्यासाठी प्रेरणा मिळत आहे. मेहनत, शिस्त आणि सातत्याच्या जोरावर विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश अभिमानास्पद आहे. भविष्यात पिंपरी-चिंचवडमधून आणखी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाचे कराटेपटू घडावेत, अशी अपेक्षा पालक व प्रशिक्षकांनी व्यक्त केली.

# एआय मुळे विश्वाच्या मूलभूत नियमांचा शोध नव्याने घेतला जाईल

**महाईन्यूज ।** पिंपरी- चिंचवड

**वैज्ञानिक संशोधनात कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मानवी बुद्धिमत्ता यांची पूरक भूमिका असते. उच्च ऊर्जा कण प्रयोगात कृत्रिम बुद्धिमत्तेच्या उपयोग होऊ शकतो. एआय मुळे विश्वाच्या मूलभूत नियमांचा शोध नव्याने घेतला जाईल. आता डार्क मॅटर आणि त्याचे स्वरूप, उत्पत्ती समजून घेण्यासाठी सुरू असलेले वैज्ञानिक प्रकल्प अधिक क्रियाशील, कार्यक्षम होतील. त्यासाठी जलद आणि तत्काळ माहिती शोधण्यासाठी सिलिकॉन चिप वर थेट एआय चा अल्गोरिदम कार्यान्वित करता येणे शक्य आहे. त्यासाठी एआय ची प्रणाली कार्यक्षम, विश्वासार्ह, समजण्यास सुलभ आणि स्पष्टीकरण करता येईल अशी असावी असे मार्गदर्शन डॉ. आशुतोष कोतवाल यांनी केले.**




पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या आकुर्डी येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मधील संगणक अभियांत्रिकी विभाग आणि संगणक अभियांत्रिकी विद्यार्थी संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने 'हिग्ज बोसॉन च्या पलीकडे – डार्क मॅटर आणि चिप वरील कृत्रिम बुद्धिमत्ता' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी अमेरिका येथील ड्यूक विद्यापीठाचे प्रा. डॉ. आशुतोष कोतवाल यांनी मार्गदर्शन केले. यावेळी जीआयएसटीचे समन्वयक नंदकुमार पळकर, पश्चिम महाराष्ट्र विज्ञान भारतीचे सचिव डॉ. कौस्तुभ साखरे, विज्ञान भारती, पश्चिम महाराष्ट्र चे कौन्सिल सदस्य अमोल देशपांडे, मानसी जोशी, संगणक विभाग प्रमुख डॉ. सोनाली पाटील आदी उपस्थित होते.

या व्याख्यानाच्या आयोजनात विज्ञान भारती, जीआरएसएस आणि जीआयएसटी यांचे सहकार्य मिळाले. कृत्रिम बुद्धिमत्ता, कण भौतिकशास्त्र आणि विश्वातील गूढ घटक यांच्यातील परस्पर संबंधावर सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई आणि पीसीसीओई चे संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन करण्यात आले होते.